जा. क्र.
शिक्षण उपसंचालक कार्यालय
पुणे विभाग पुणे 1
दिनांक 23-11-2011

प्रति ,
1. प्राचार्य ,
सर्व कनिष्ठ महाविद्यलय ,
जि. पुणे
2. प्राचार्य ,
सर्व अध्यापक विद्यालये
जि. पुणे
3. मुख्याध्यापक ,
सर्व माध्यमिक शाळा ( अनुदानित /विनाअनुदानित )
पिंपरी चिंचवड म.न. पा माध्यमिक शाळा / पुणे म. न. पा. माध्यमिक शाळा
जि. पुणे
4. मुख्याध्यापक
सर्व जिल्हा परिषद शाळा / प्राथमिक शाळा ( अनुदानित /विनाअनुदानित )
पिंपरी चिंचवड म. न. पा प्राथमिक शाळा / पुणे म. न. पा. प्राथमिक शाळा
जि. पुणे

**विषय :- 5 वा स्काऊट गाईड राज्य मेळावा निधी संकलनाबाबत.**

**संदर्भ :- दिनांक 21-11-2011 रोजी सर्व संघटना ,अधिकारी ,पदाधिकारी यांची उपसंचालक यांचे अध्यक्षतेखाली झालेली बैठक**

महाशय

वरील संदर्भिय विषयानुसार आपणास विदित करण्यात येते की , महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् मुंबई व पुणे भारत स्काऊटस् आणि गाईडस् जिल्हा संस्था , पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 2 ते 8 जानेवारी 2012 या कालावधीत गो-हे ब्रुदुक – डोणजे , ता – हवेली , जि. पुणे या ठिकाणी 5 वा स्काऊट गाईड राज्य मेळावा आयोजित करण्याचे निश्चित झाले आहे. स्काऊट / गाईड राज्य मेळावा 4 वर्षातून एकदा होत असतो. हा मेळावा आयोजित करण्याचा मान यावर्षी पुणे जिल्हयास प्राप्त झालेला आहे. या मेळाव्यासाठी संपूर्ण राज्यातून सुमारे 12000 विद्यार्थी /शिक्षक उपस्थित राहणार आहेत. हा मेळावा यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची व योगदानाची अत्यंत आवश्यकता आहे. सदर मेळाव्याच्या आयोजनासाठी सुमारे रुपये 75 लाख खर्च अपेक्षित आहे.

या राज्यस्तरीय मेळाव्याकरिता स्थानिक शिक्षण संस्था , उद्योजक , प्राथमिक शाळा , माध्यमिक शाळा कनिष्ठ महाविद्यालय , अध्यापक विद्यालये यांच्याकडून वर्गणी घेवून निधी उपलब्ध करणे अपेक्षित आहे. शिक्षण उपसंचालक तथा कार्याध्यक्ष , महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट गाईड राज्य मेळावा संयोजक पुणे , यांच्या अध्यक्षतेखाली , अधिकारी तसेच सर्व संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक दिनाक 21-11-2011 रोजी उपसंचालक , पुणे विभाग , पुणे यांचे कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत खाली नमूद केल्याप्रमाणे वर्गणी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

| अनुक्रमांक | पद | वर्गणीची रक्कम रुपये |
|---|---|---|
| 1 | शिक्षण उपसंचालक व तत्सम पदांच्या पुढील पदावर कार्यरत असलेले अधिकारी | रुपये 1000/– |
| 2 | वर्ग – 1 अधिकारी ( शिक्षण विभाग फक्त ) | रुपये 500/– |
| 3 | वर्ग –2 अधिकारी ( शिक्षण विभाग फक्त ) | रुपये 200/– |
| 4 | मुख्याध्यापक / प्राचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा | रुपये 100/– |
| 5 | विस्तार अधिकारी | रुपये 100/– |
| 6 | केंद्र प्रमुख | रुपये 100/– |
| 7 | प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक , शिक्षक | रुपये 15/– |
| 8 | माध्यमिक शाळांचे शिक्षक | रुपये 25/– |
| 9 | अध्यापक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रति अध्यापक व प्राध्यापक | रुपये 25/– |
| 10 | अध्यापक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय प्रति विद्यार्थी | रुपये 10/– |
| 11 | माध्यमिक शाळेतील प्रति विद्यार्थी | रुपये 5/– |
| 12 | प्राथमिक शाळेतील प्रति विद्यार्थी | रुपये 2/– |

वरीलप्रमाणे वर्गणी निश्चित करण्यात आली .सर्वांचा सहभाग आवश्यक असल्याने वर्गणी गोळा करण्याकरिता सर्व शिक्षक व विद्यार्थी यांना सहभागी करुन घ्यावे. मेळावा निधी डी. डी. / चेक द्वारा **महाराष्ट्र राज्य भारत स्काऊटस् आणि गाईडस् राज्य मेळावा** या नांवे **बॅक ऑफ बडौदा , सदाशिव पेठ शाखा , पुणे , खाते कमांक 04500100023286** येथे जमा करुन त्याची प्रत व यादी अधिक्षक , ग्रामीण व शहरी वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक ,पुणे यांचेकडे जमा करावी.

श्री सदाशिव चव्हाण , विस्तार अधिकारी व श्री सचिन वाडकर हे निधी संकलनाचे प्रमुख म्हणून कामकाज पाहतील.

| | | |
|---|---|---|
| ( दत्तात्रय शेंडकर ) | ( विद्या शिंदे ) | ( रामचंद्र जाधव ) |
| शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) | शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) | शिक्षण उपसंचालक , पुणे विभाग |
| जिल्हा परिषद , पुणे ,तथा | जिल्हा परिषद , पुणे ,तथा | तथा , राज्य मुख्यालय आयुक्त |
| जिल्हा मुख्यालय आयुक्त ( स्काऊट ) | सहा. राज्य आयुक्त ( गाईड) | महाराष्ट्र राज्य भारत स्काउटस् गाईडस् मुंबई |
| | पुणे विभाग | तथा , कार्याध्यक्ष , राज्य मेळावा |

प्रत :– माहितीस्तव सविनय सादर.

1. मा. आयुक्त
   पुणे महानगरपालिका ,
   शिवाजीनगर ,पुणे – 5
2. मा. आयुक्त
   पिंपरी चिंचवड महानगरपालिका
   पिंपरी , पुणे – 18
3. मा. जिल्हाधिकारी ,
   पुणे
4. मा. संचालक ,
   महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद
   चर्नीरोड , मुंबई –32
5. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी ,
   जिल्हा परिषद , पुणे
6. मा. शिक्षण संचालक ,
   ( माध्यमिक व उच्च माध्यमिक )
   महाराष्ट्र राज्य , पुणे
7. मा. शिक्षण संचालक , ( प्राथमिक )
   महाराष्ट्र राज्य , पुणे
8. मा. संचालक ,
   महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,
   सदाशिव पेठ पुणे – 30
9. मा. आयुक्त
   शासकीय परीक्षा परिषद ,पुणे
10. मा. अध्यक्ष
    महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
    भांबुर्डा , शिवाजीनगर पुणे –5
11. विभागीय सचिव ,
    महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ,
    शिवाजीनगर पुणे –5
12. प्राचार्य
    जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था , लोणीकाळभोर ,
    ता – हवेली जि. पुणे वेळापूर , ता – माळशिरस , जि. सोलापूर ,
    संगमनेर ता – संगमनेर जि. अहमदनगर
13. शिक्षण प्रमुख
    पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळ ,
    शिवाजीनगर पुणे – 5
14. शिक्षणाधिकारी ( प्राथमिक / माध्यमिक )
    जिल्हा परिषद ,पुणे
15. प्रशासन अधिकारी ,
    महानगरपालिका शिक्षण मंडळ,
    पिंपरी –चिंचवड पिंपरी पुणे – 18
16. अधिक्षक ( ग्रामीण व शहरी )
    वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक ,
    ( प्राथमिक / माध्यमिक ) जि. पुणे
17. अध्यक्ष / सचिव ,
    मुख्याध्यापक शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी संघटना ( सर्व )
    जि. पुणे सोलापूर , अहमदनगर